क्रमांक: एलआरएफ-२६८९/प्र.क्र.६०१६[ग६]ज-३.

महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: १८ मे, १९९०

विषय:- जमीन - मुंबई उपनगर जिल्हा
वर्सोवा येथील स.नं. १६१ लगतची खाडीपैकी जमीन .......
वृंदावन चॅरिटेबल ट्रस्टला देण्याबाबत....

ज्ञापन:-

अपर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा, मुंबई यांच्या वरील विषयाच्या क्र.१२/३ब/ड-०१०३, दिनांक १३ डिसेंबर, १९८९ च्या पत्राच्या अनुषंगाने त्यांना विज्ञप्तीपूर्वक असे कळविण्याचा मला निदेश आहे की, मुंबई उपनगर जिल्ह्यातील वर्सोवा येथील स.नं. १६१ लगतच्या खाडीपैकी जमिनीतील सुमारे ४५७५ चौ.मी. च्या भूखंडापैकी [संदर्भाधीन अहवालात हे क्षेत्र सुमारे ६००० चौ.मी. असेही नमूद करण्यात आलेले आहे] ८०० चौ.मी. जमीन महाराष्ट्र जमीन महसूल[सरकारी जमिनीची विल्हेवाट] नियम, १९७१ पैकी नियम ५ आणि शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. एलआरएफ-१०८३/१४९६/सीआर-३७००/ग६, दिनांक ११ मे, १९८४ मधील तरतुदींनुसार तिच्या नगर रचना व मूल्य निर्धारण विभागाकडून निर्धारित केल्या जाणाऱ्या दिनांक १.२.१९७६ रोजीच्या किंमतीच्या २टक्के इतके भाडे प्रतिवर्षी आकारून ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने वृंदावन चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई या संस्थेला १००० श्रोत्यांची बसण्याची व्यवस्था असलेले सभागृह, ऑडिओ-व्हिडीओ, लायब्ररी, रियाझ करण्यासाठी २ खोल्या, रहिवासासाठी २ खोल्या व १० x १० फूटाची १० झोपडीवजा बांधकामे करुन हिंदुस्थानी संगीताचे शिक्षण देण्याची व्यवस्था करण्याकरिता देण्यास शासन आता मान्यता देत आहे. वरीलप्रमाणे देण्यात येत असलेली मंजुरी शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र. एलआरएफ-१०८३/७११३४/प्र.क्र. ३४७८/ग-६, दिनांक ८ फेब्रुवारी, १९८३ च्या परिच्छेद १० व १२ मधील अटी व शर्ती आणि पुढीलप्रमाणे विशिष्ठ अटींना अधीन राहून देण्यात येत आहे:-

[१] प्रश्नाधीन जमिनीची दिनांक १ फेब्रुवारी, १९७६ रोजीची बाजार किंमत अपर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा, मुंबई यांनी नगर रचना व मूल्यनिर्धारण विभागाकडून तात्काळ ठरवून घ्यावी व ती शासनास त्वरित कळवावी. दरम्यान प्रती चौ.मी.ला रु. ६०/- [साठी फक्त] दि. १.२.७६ रोजीची तात्पुरती किंमत काढून तिच्या २[दोन] टक्के इतके तात्पुरते भाडे प्रश्नाधीन जमिनीसाठी आकारण्यात यावे. संस्थेकडून असे मुद्रांकित हमीपत्रही घेण्यात यावे.

....२/-

Scanned by CamScanner

की, या जागेचे वरीलप्रमाणे मूल्यांकन करून झाल्यानंतर शासन अंतिमरित्या जी भाड्याची रक्कम ठरवील ती संस्था मान्य करील व ती रक्कम तात्पुरत्या भाड्याच्या रकमेपेक्षा जास्त आढळून आल्यास त्यातील फरकाची रक्कम आणि जमिनीचा ताबा घेतल्याच्या तारखेपासून फरकाच्या रकमेचा शासनास पूर्णतया भरणा होईपर्यंतच्या कालावधीसाठी त्या रकमेवर प्रचलित दराने देय होणारे व्याज या रकमांचा भरणा, तत्संबंधीची सूचना दिल्यापासून १ महिन्याचे आत शासनास भरील.

[२] भाड्याची रक्कम भाडेपट्टयाच्या मुदतीत प्रत्येक १० वर्षानंतर पुनर्निर्धारित करण्यात येईल.

[३] ह्या आदेशांच्या तारखेपासून ३ महिन्यांच्या आत संस्थेने प्रश्नाधीन जागेवर बांधावयाच्या आपल्या प्रकल्पाच्या बांधकामाचे आराखडे आणि अंदाजित खर्च याचा तपशील अपर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा मुंबई यांच्याकडे सादर करावा आणि सदर प्रकल्पाच्या अंदाजित खर्चाच्या २५टक्के इतकी रोख रक्कम संस्थेकडे उपलब्ध असल्याचा तसेच संपूर्ण प्रकल्प जमिनीचा ताबा घेतल्यापासून २ वर्षाच्या आत पूर्ण करण्याची संस्थेची क्षमता असल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा अपर जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करावा. असा पुरावा संस्थेने सादर केल्यानंतरच प्रश्नाधीन जमिनीचा प्रत्यक्ष ताबा संस्थेला देण्यात यावा.

[४] संस्थेने प्रश्नाधीन जमिनीचा अथवा तीवरील बांधकामाच्या कोणत्याही भागाचा उपयोग व्यापारी प्रयोजनार्थ तसेच कोणत्याही प्रकारे नफा मिळविण्यासाठी करू नये.

२. सोबत कागदपत्रांची १ संचिका परत करण्यात येत आहे.

३. हे आदेश, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग आणि वित्त विभाग [अनौ. संदर्भ क्र. ३२४/व्यय-९, दिनांक २. ५. १९९०] यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[जयंत व. दिवाण]
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग

सोबत:- कागदपत्रांची १ संचिका.



Scanned by CamScanner

प्रति,

अपर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा,
मुंबई.

प्रतिलिपी माहितीसाठी अग्रेषित:-

आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.

जमाबंदी आयुक्त, व संचालक भूमी अभिलेख , महाराष्ट्र राज्य, पुणे.

उपसंचालक, भूमी अभिलेख, कोकण विभाग, मुंबई.

महालेखाकार, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर

महालेखाकार, महाराष्ट्र राज्य, [लेखा व अनुज्ञेयता]मुंबई/नागपूर

नगर विकास विभाग.

समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग

वित्त विभाग,
प्रकरण क्र. २८१/ज-३ व ३९८/ज-३ वर ठेवण्यासाठी
ज-३ निवड नस्ती.

Scanned by CamScanner

53

क्रमांक १२/जडी/सा-507

अपर जिल्हाधिकारी यांचे कार्यालय,
मुंबई उपनगर जिल्हा,
जुने जकात घर, फोर्ट, मुंबई-४०० ०२३.

दिनांक ७-६-१९९०.

वाचा:-१) वृंदावन थेरॅटेकल ट्रस्टचा अर्ज दिनांक २५-१०-१९८९.
२) शासन महसूल व वन विभाग ज्ञापन क्रमांक एलआरएच/२६८९/प्र.क्र. ६०१६ [ग-६] ज-२ दिनांक १८-५-१९९०.

## आ दे श

मुंबई उपनगर जिल्ह्यातील मौजे वर्सोवा येथील सर्वे नं. १६१ लगतच्या वाडीपैकी जमिनीतील सुमारे ४५७५ चौ. मिटरच्या भूखंडापैकी ८०० चौ.मि. जमिन महाराष्ट्र जमिन महसूल [सरकारी जमिनीची विल्हेवाट] नियम १९७१ या नियम ५ आणि शासन निर्णय महसूल व वन विभाग क्रमांक एलआरएफ-१०८३/१४९६/सीआर-३५००/ग-६ दिनांक ११-५-१९८४ मधील तरतुदीनुसार होणाऱ्या नगर रचना व मुल्य निर्धारण विभागाकडून निर्धारीत केल्या जाणाऱ्या दिनांक १-२-१९७६ रोजीच्या किंमतीच्या दोन टक्के इतके भाडे प्रतिवर्षी आकारुन ३० वर्षांच्या भाडेपट्टयाने वृंदावन थॅरिटेकल ट्रस्ट, मुंबई या संस्थेला १००० श्रोत्यांची बसण्याची व्यवस्था असलेले सभागृह, ऑडिओ-व्हीडीओ लायब्ररी, रियाझ करण्यासाठी दोन खोल्या, रहिवाशांसाठी दोन खोल्या व १० x १० फूटाची १० झोपडी वजा बांधकाम करुन हिंदुस्थानी संगीताचे शिक्षण देण्याची व्यवस्था करण्याकरीता देण्यास शासनाने मान्यता दिली आहे. सदरची मंजूरी खालीलप्रमाणे अटी व शर्ती तसेच विशिष्ट अटींना आधीन राहून देण्यात येत आहे.

१] प्रश्नाधिन जमिनीची दिनांक १-२-१९७६ रोजीची बाजार किंमत नगर रचना व मुल्य निर्धारण विभागाकडून ठरवून येईपर्यन्त तात्पुरता दर रुपये ८०/- प्रती चौरस मिटर धरुन सदर जमिनीचे तात्पुरते भाडे रक्कम रुपये ११२६.४० आकारण्यात येत आहे. संस्थेने भाड्याची रक्कम प्रती वर्षी ऑगस्ट महिन्याच्या १ तारखेला [आगाऊ] तहसिलदार अंधेरी यांचे कार्यालयात भरावयाची आहे. सदर भाडे संस्थेला जमिनीचा ताबा दिल्याच्या तारखेपासून लागू होईल. वरीलप्रमाणे आकारण्यात येत असलेले सवलतीचे भाडे हे तात्पुरत्या बाजार भावावर आधारीत असल्यामुळे संस्थेने रुपये १०/- च्या मुद्रांकीत पेपरवर हमी पत्र द्यावे की, या जागेचे वरीलप्रमाणे मुल्यांकन करुन झाल्यानंतर शासन अंतिम रित्या जी भाड्याची रक्कम ठरविल ती संस्था मान्य करील व ती रक्कम तात्पुरत्या भाड्याच्या रकमेपेक्षा जास्त आढळून आल्यास त्यातील फरकाची रक्कम आणि जमिनीचा ताबा घेतल्याच्या तारखेपासून फरकाच्या रकमेचा शासनात पूर्णतया भरणा होईपर्यन्तच्या कालावधीसाठी त्या रकमेवर प्रच

[क्र.मा.

received
[signature]
7th June 90

दराने देय होणारे व्याज या रकमांचा भरणा मुदतीसंबंधीची सूचना दिल्यापासून १ महिन्याच्या आत शासनात करणे.करील.

२) भाड्याची रक्कम भाडेपट्ट्याच्या मुदतीत प्रत्येक १० वर्षांनंतर - पुनर्निर्धारित करण्यात येईल.

३) ह्या आदेशाच्या तारखेपासून तीन महिन्याच्या आत संस्थेने - प्रस्तावित जागेवर बांधावयाच्या आवश्यक प्रकल्पाच्या बांधकामाचे आराखडे आणि अंदाजे खर्च याचा तपशील या कार्यालयात सादर करावा आणि सदर प्रकल्पाच्या अंदाजीत खर्चाच्या २५ टक्के इतकी रोख रक्कम संस्थेकडे उपलब्ध असल्याचा तसेच संपूर्ण प्रकल्प जमिनीचा ताबा घेतल्यापासून दोन वर्षाच्या आत पूर्ण करण्याची संस्थेची क्षमता असल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा या कार्यालयात सादर करावा असा पुरावा संस्थेने सादर केल्यानंतरच प्रस्तावित जमिनीचा प्रत्यक्ष ताबा संस्थेस देण्यात येईल.

४) संस्थेला प्रस्तावित जमिनीचा अथवा तिच्यावरील बांधकामाच्या - कोणत्याही भागाचा उपयोग व्यापारी प्रयोजनार्थ तसेच कोणत्याही प्रकारे नफा मिळविण्यासाठी करता येणार नाही.

५) सदरची जमिन अथवा तिचा कोणताही भाग किंवा त्यामधील कोणतेही हक्क शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय हस्तांतर करता येणार नाहीत.

६) संस्थेने जिल्हाधिकारी व बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी नियोजित इमारतीच्या नकाशास मंजुरी दिल्यानंतर सदर जमिनीवर बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या विकास नियंत्रण नियमास अधिन राहून बांधकामे करावीत. एकदा बांधकाम पूर्ण झाल्यानंतर जिल्हाधिका-यांच्या पूर्व परवानगीशिवाय वाढीव बांधकाम अथवा त्यामध्ये फेरबदल करता येणार नाही.

७) सदर जमिनीवर बांधण्यात येणा-या बांधकामामध्ये देण्यात येणारे हे हिन्दुस्थानी संगीताचे शिक्षण हे सर्व जाती पंथ व धर्माचे लोकांसाठी खुले - राहील.

८) जमिनीचा ताबा घेतल्यापासून दोन वर्षामध्ये संस्थेने कमीत कमी दर चौरस मिटरला एक या प्रमाणे झाडे लावून त्यांची निरंतर निगा राखावी.

९) सर्व खाणी व खनीज द्रव्य यावर शासनाचा अधिकार असेल आणि - खाणकाम करण्याच्या अथवा खनिज द्रव्ये शोधण्याच्या प्रयोजनार्थ सदर जमिनीवर प्रवेश करण्याचे स्वातंत्र्य शासनास राहील.

१०) जमिनीचा विकास संस्थेने स्वखर्चाने करावयाचा आहे.

११) वरील अटी व शर्ती अंतर्भूत करुन तसेच जिल्हाधिका-यांना वाटतील त्या अधिक अटी व शर्ती अंतर्भूत करुन करारनामा करण्यासाठी संस्थेच्या प्रतिनिधीला बोलावण्यात येईल त्यावेळी ते हजर राहून करारनाम्यावर सह्या

Scanned by CamScanner

करतील.

१२) वरील शर्त क्रमांक १ व ३ ची पूर्तता केल्यानंतर जमिनीचा ताबा देणे व करारनामा करण्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

१३) वरीलपैकी कोणत्याही अटी व शर्तींचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास सदरची जमिन व त्यावरील बांधकामे सरकार जमा करण्यास संस्था पात्र ठरतील.

अपर जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा.

प्रति,
वृंदावन चॅरिटेबल ट्रस्ट
२०२, रिझर्व्ह पार्क, एस. व्ही. रोड,
सांताक्रुझ, मुंबई-४०० ०५४.

मउदे/व.प.

**प्रत :-**

१] तहसिलदार अंधेरी यांचेकडे माहिती व जरूर त्या - कार्यवाहीसाठी रवाना.

२] नगर भूमापन अधिकारी क्रमांक, पद्मचंदन अपार्टमेन्ट, एस. व्ही. रोड, जोगेश्वरी [प.] मुंबई-४०० ०६० यांचेकडे माहितीकरिता रवाना.

२/- संस्थेने शर्त क्रमांक १ व ३ ची पूर्तता केल्यानंतरच संस्थेला जमिनीचा ताबा देण्याविषयी जरूर त्या सूचना व नकाशाची प्रत त्यांचेकडे पाठविण्यात येईल.

अपर जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा.

Scanned by CamScanner